<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.२</u>

नि.दि.दा.क्र.११९/२०१७
मुकूंद विरुध्द मदन व इतर
नि.क्र.३३.

**मी देवाची शपथ खरे सांगतो की,**

माझे नाव – विजय लहुदास पिसाळ
वय – ५० वर्षे, कामधंदा - निमतानादार
नेमणुक – उपअधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, खंडाळा.

**<u>सरतपासणी वादीतर्फे विधिज्ञ श्री. एस.एस. माने</u> -**

सन २०१५ ते २०२० या कालावधीत मी निमतानादार या पदावर कार्यरत होतो. त्या करीताचे प्रशिक्षण मी घेतलेले आहे. प्रस्तुत प्रकरणात मला नि.क्र.२२ नुसार साक्ष समन्स प्राप्त झाल्याने मी साक्षीस आलो आहे. तत्पुर्वी मी प्रस्तुत प्रकरणातील आमच्या कार्यालयातील दस्तऐवजांबाबत माहिती घेतली होती. तथापी मुळ अभिलेख (मोजणीची अ प्रत) आमच्या कार्यालयात मिळुन आलेली नाही, परंतु मोजणीची ब प्रत दाव्यात दाखल असुन मुळ जबाब, नोटीस इत्यादी संपूर्ण प्रकरण त्यासह दाखल आहे. मला प्रस्तुत प्रकरणात मोजणी क्र.८२/२०१९ नुसार सि.स.नं.७२६, ७२७, ७२८ व ७२९ ची मोजणी करण्याबाबत आदेशित करण्यात आले होते. त्याप्रमाणे मी मोजणी केली होती. तत्पुर्वी मी मिळकतधारक म्हणजेच वादी व प्रतिवादी यांना मोजणीची पुर्व नोटीस दिली होती. त्याप्रमाणे दि.२७.११.२०१९ रोजी प्रत्यक्ष मोजणी करताना ते हजर होते. त्याप्रमाणे मी त्यांचे जबाब देखील नोंदविले होते. आता मला वादी मुकूंद विठोबा कदम व प्रतिवादी क्र.१ मदन तुकाराम कदम यांचा मुळ जबाब दाखविण्यात आला. त्यावर संबंधीत वादी व प्रतिवादी तसेच माझी सही आहे. तो जबाब मी प्रत्यक्ष मोजणीच्या ठिकाणी नोंदविलेला असुन बरोबर आहे. त्यास नि.क्र. ३४ देण्यात येते. त्यावेळी मी पंचनामा सुध्दा केला होता. आता मला तो मुळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी तसेच पंच म्हणुन शेखर संपतराव शिंदे, सतिश बळिराम गुरव व संभाजी विठ्ठल कदम यांच्या सहया आहेत. त्यातील मजकुर बरोबर आहे. तो मुळ पंचनामा नि.क्र.३५ वर आहे.

२. मी प्रत्यक्ष मोजणी करण्यापुर्वी भुईंज गावातील आमच्या कार्यालयातील संपूर्ण अभिलेख तपासुन पाहिला होता. त्याप्रमाणे मी दि.२७.११.२०१९ रोजी उपरोक्त मिळकतींची संबंधीतांच्या उपस्थीतीत प्लेन टेबल पध्दतीने मोजणी केली होती. त्याप्रमाणे मी मोजणीची

नकाश तयार केला होता. आता मला त्या नकाशाची ब प्रत दाखविण्यात आली. ती तीच असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. तसेच त्यावर छाननी लिपिक व मुख्यालय सहायक यांची देखील सही आहे, तसेच त्यांचा शिक्का देखील आहे. त्या मोजणीत सि.स.नं.७२७ च्या धारकांनी सामाईक बोळात ४.३३ चौ.मीटर एवढे अतिक्रमण केल्याचे आढळुन आले होते व तशी नोंद नकाशात स्पष्ट दर्शविली आहे. नकाशाची अ प्रत व ब प्रत या दोन्ही मुळ प्रती असुन एकसमान आहेत. अभिलेखावरील दाखल ब प्रत नि.क्र. ३६ वर आहे.

सरतपास पुर्ण

उलटतपास प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री यु.एच.सणस

प्रकरण उलटतपासाकरीता तहकुब.

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,

वाई.
दि.०६.०१.२०२५

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE

Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2025.01.07 17:51:07 +0530

(आर.एम. भेंडे)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, वाई.